**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक ३ जून २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' असा दर्जा बहाल**

**2. विधान परिषद निवडणुकीकरता महायुतीच्या १७ उमेवारांची यादी जाहीर**

**3. नागपूर महानगरपालिके तर्फे 5 जून पर्यावरण दिन ते 21 जून आंतरराष्ट्रीय योगा दिन या 15 दिवसांच्या काळात विविध उपक्रमांचं आयोजन**

**4. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या द्वितीय कार्यकर्ता विकास वर्गाचा उद्या पद्मभूषण कुमार मंगलं बिर्ला यांच्या उपस्थितीत समारोप**

---------------------------------------------

**राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार**

राज्य सरकारने मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' असा दर्जा बहाल केला असून यासंदर्भातील अधिसूचना जारी करण्यात आली आहे. देशातील अकरा राज्यांतून शेतमालाची आवक आणि सुमारे चार लाख मेट्रिक टन वार्षिक उलाढाल यामुळे नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला हा दर्जा देण्यात आला आहे. नागपूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात मुख्य बाजारासह कळमना आणि इतर उपबाजारांचा समावेश आहे. येथे कापूस, सोयाबीन, संत्री, तृणधान्ये आणि भाज्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होते. या निर्णयामुळे नागपूरचा कृषी बाजार देशाच्या मुख्य व्यापारी प्रवाहाशी अधिक सक्षमपणे जोडला जाणार आहे. तसेच आंतरराज्यीय ई-व्यापाराला चालना मिळणार असून इतर राज्यांतील व्यापाऱ्यांनाही थेट व्यापाराची संधी मिळेल. व्यापारी, शेतकरी आणि बाजार समिती यांच्यातील वादांचे ३० दिवसांत निवारण करण्यासाठी विशेष 'फास्ट ट्रॅक' यंत्रणाही कार्यान्वित करण्यात येणार आहे. पणन मंत्री जयकुमार रावल यांची मुंबईच्या राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्षपदाचा पदभार पणन मंत्री रावल यांनी आज वाशी इथल्या कार्यालयात जाऊन स्वीकारला.

---------------------------------------------

**१७ उमेवारांची यादी**

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीकरता महायुतीच्या १७ उमेवारांची यादी आज जाहीर करण्यात आली. या निवडणुकीत महायुतीच्या घटक पक्षांकडून राजीव पोतदार, अविनाश

ब्राह्मणकर, अरुण लखानी, प्रवीण पोटे, राजेंद्र राऊत, प्राजक्त तनपुरे, नंदकिशोर महाजन, धैर्यशील कदम, अमरनाथ राजूरकर, बसवराज पाटील, सुहास शिरसाठ, रविंद्र फाटक, दुष्यंत चतुर्वेदी, सईद खान, नरेंद्र दराडे, अनिकेत तटकरे, विक्रम काकडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.दरम्यान यवतमाळ विधानपरिषदेसाठी भरलेला आपला अर्ज कॉंग्रेस उमेदवार साहेबराव कांबळे यांनी आज मागे घेतल्याची माहिती नुकतीच आमच्या प्रतिनिधीने दिली आहे

---------------------------------------------

**पर्यावरण दिन**

येत्या पाच तारखेला साजरा होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण आणि वातारवणीय विभागाच्या वतीने रोजच्या वापरातील पर्यावरणपूरक वस्तूंचं किट तयार करण्यात आलं आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हे किट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातल्या सदस्यांना भेट देऊन जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर वाढवण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.

---------------------------------------------

**आंतरराष्ट्रीय योगा दिन**

नागपूर महानगरपालिकेद्वारा 5 जून पर्यावरण दिन ते 21 जून आंतरराष्ट्रीय योगा दिन या 15 दिवसांच्या काळात विविध प्रकारचे उपक्रम राबविले जाणार आहेत. या दरम्यान महानगरपालिकेने झोननिहाय वृक्षारोपणाच्या माध्यमातून 5 लक्ष वृक्ष लागवडीच लक्ष्य समोर ठेवलं असल्याची माहिती महापौर निता ठाकरे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

***(होल्ड बाईट - महापौर निता ठाकरे 32 सेकंद)***

या सर्व उपक्रमांमध्ये नगरसेवक, नागरीक, स्वयंसेवी संस्था, पर्यावरणवादी तसेच धार्मिक संस्था देखील सहभागी होणार आहेत.

---------------------------------------------

**विप्लव बाजोरिया**

अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या अर्ज छाननी प्रक्रियेदरम्यान अपक्ष उमेदवार विप्लव बाजोरिया यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी आशीष येरेकर यांच्याशी असभ्य वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी बाजोरिया यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

---------------------------------------------

**विजय वडेट्टीवार**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून राज्य सरकारवर टीका केली आहे. दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीची घोषणा करूनही त्यापेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतकऱ्यांचे काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. थकीत कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्ज मिळत नसल्याचेही त्यांनी सांगितले. कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार याबाबत सरकारने स्पष्टता द्यावी, अशी मागणी करत ही कर्जमाफी केवळ दिखावा असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना केला

---------------------------------------------

**आंदोलन**

भंडारा इथं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या किमतींच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आलं. यावेळी कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत महागाई नियंत्रणात आणण्याची मागणी केली. इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर आर्थिक भार वाढल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यामुळे पेट्रोल-डिझेल आणि गॅसच्या किमती कमी करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

---------------------------------------------

**मंत्रीमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाने भारतीय विमान कंपन्यांना दिलासा देण्यासाठी १० हजार कोटी रुपयांच्या 'एटीएफ प्राइस स्टॅबिलायझेशन फंड'ला मंजुरी दिली आहे. विमान इंधनाच्या वाढत्या किमतींचा परिणाम कमी करून विमान वाहतूक क्षेत्रातील सुमारे ७७ लाख रोजगार सुरक्षित ठेवण्याचा या निर्णयामागील उद्देश आहे.

---------------------------------------------

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या द्वितीय कार्यकर्ता विकास वर्गाचा समारोप सोहळा उद्या ४ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर होणार आहे. या अखिल भारतीय प्रशिक्षण वर्गाच्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उद्योगपती पद्मभूषण कुमार मंगलं बिर्ला उपस्थित राहणार असून सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यावेळी उपस्थितांना संबोधित करतील. ११ मेपासून सुरू झालेल्या या वर्गात देशभरातील ८८० शिक्षार्थी सहभागी झाले आहेत. या सहभागींमध्ये विद्यार्थी,

व्यावसायिक आणि प्रचारकांचा समावेश असून बहुसंख्य शिक्षार्थी पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत.

-------------------------------------------

**केंद्र सरकारची १२ वर्षे**

केंद्र सरकारला बारा वर्ष पूर्ण झाली आहेत. या बारा वर्षामध्ये सरकारने पीएलआय म्हणजेच प्रॉडक्शन लिंकड् इनसेंटीवच्या माध्यमातुन उत्पादन क्षमता विकासाला चालना देण्याचा उपक्रम राबविला आहे. या उपक्रमाविषयी रे नियो फार्माचे संचालक अमित पटनी यांनी नागपुरात आकाशवाणी सोबत बोलताना सांगितल की -

***(होल्ड बाईट - पाटणी - ४० सेकंद )***

-------------------------------------------

**शेफ विष्णू मनोहर**

नागपूरच्या प्रसिद्ध तर्री पोहयांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी शेफ विष्णू मनोहर ७ जून रोजी ३,००० किलो तर्री पोहे तयार करण्याचा विश्वविक्रम करण्याचा प्रयत्न करणार आहेत. 'जागतिक पोहे दिना'निमित्त बजाज नगर येथील विष्णूजी की रसोई येथे हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. तयार करण्यात आलेल्या तर्री पोहयांचे सकाळी ६.३० ते ९.३० या वेळेत नागरिकांना मोफत वितरण करण्यात येणार असून महाचायतर्फे मोफत चहाही दिला जाणार आहे.

-------------------------------------------

**गडचिरोली क्रीडा**

गडचिरोली जिल्ह्याच्यातील लॉयड्स स्पोर्ट्स अकादमीच्या विद्यार्थ्यांनी गोवा इथं आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या अखिल भारतीय इनडोअर तिरंदाजी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण आणि रौप्य पदकांची कमाई केली. ही स्पर्धा गोवा अमेच्युअर आर्चरी असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आली होती. देशातील विविध राज्यांतील प्रतिभावान तिरंदाजांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यात लॉयड्स स्पोर्टस अकादमीची दिया बॅनर्जी हिने अंडर-२१ गटात उत्कृष्ट प्रदर्शन करत सुवर्ण पदक तसेच आपल्या गटातील राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. तसेच आदित्य नायगमकर याने अंडर-१८ गटात रौप्य पदक जिंकले.

-------------------------------------------

**सायकल रॅली**

जागतिक सायकल दिनानिमित्त आज पोलिस विभागाच्या वतीने गडचिरोली शहरात सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत १५० हून अधिक पोलिस अधिकारी, अंमलदार,

नागरीक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन निरोगी जीवन आणि पर्यावरणाचा संदेश दिला.

-------------------------------------------

**हवामान**

आगामी पाच जून पर्यंत विदर्भाच्या बहुतांश जिल्हयांमध्ये वादळी पर्जन्यमान राहणार असून, उद्या वर्धा जिल्हयात वादळी पर्जन्यमानाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. यादरम्यान मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आज देखील अकोला, बुलढाणा आणि वाशिम जिल्हा वगळता विदर्भाच्या सर्व जिल्हयांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

-------------------------------------------

**बस अपघात**

गुजरातमधे बारडोली इथं काल महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या दोन बस एकमेकांना धडकून झालेल्या अपघातातबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले आहेत. बारडोलीतल्या उवा गावात हा अपघात झाला.

-------------------------------------------